झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स-II, सेनापती बापट रोड, पुणे -१६
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-२/१२३ /२०२३
दिनांक :-१३/१०/२०२३

"झोपडपट्टी पुनर्वसन आदेश (अंतिम)"
महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३क अन्वये अंतिम आदेश

प्रस्तावना-

फा.प्लॉ.नं.१३२ पैकी, ताडीवाला रोड, संगमवाडी टी.पी. स्कीम नं.३, पुणे येथील अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३(क) अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

(१) ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, पुणे हे सक्षम आहेत ; आणि

(२) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.२९/०८/२०२३ रोजीची पूर्वसूचना प्रकरणातील सविस्तर पार्श्वभूमी नमूद करुन महाराष्ट्र शासन राजपत्र सप्टेंबर ७-१३, २०२३ मध्ये पृष्ठ क्र.१६ व १७ वर तसेच दैनिक वृत्तपत्रात दि.०१/०९/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच, सदरची पूर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसून येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दि.०१/०९/२०२३ रोजी डकवून प्रसिध्द करण्यात आली आहे ; आणि

(३) ज्याअर्थी, सदर पूर्वसूचनेची प्रत जागा मालक, पुणे महानगरपालिका यांना देखील देण्यात आली आहे. पूर्वसूचनेद्वारे जागा मालक किंवा इतर यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत या कार्यालयाकडे सादर करणेबाबत फर्माविण्यात आले होते. सदरची पूर्वसूचना प्रसिध्द करणेत येवून ३० दिवसांचा कालावधी पूर्ण झाला आहे. अद्यापपर्यंत या कार्यालयाकडे जमीन मालक अथवा इतर कोणाचीही लेखी स्वरुपात हरकत/तक्रार प्राप्त झालेली नाही; आणि

त्याअर्थी, उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता महाराष्ट्र झोपडपट्टीच्या कलम ३(क) मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

आदेश :-

(१) सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्या संदर्भातील दि.२९/०८/२०२३ रोजीची जाहिर नोटीस (झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषीत करण्याची पूर्वसूचना) कायम करुन खालील अनुसूचीमध्ये

निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषित करण्यात येत आहे.

(२) सदरच्या आदेशाविरोधात उक्त अधिनियमाच्या कलम ३(क) मधील तरतुदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिध्द झालेपासून ३०दिवसांचे आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करणे शक्य आहे.

## अनुसूची

झोपडपट्टीचे नाव :- फा.प्लॉ.नं.१३२ पैकी, ताडीवाला रोड, संगमवाडी टी.पी. स्कीम नं.३, पुणे
महानगरपालिका क्षेत्र :- पुणे महानगरपालिका.

| गाव- संगमवाडी, पुणे | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| स.नं./ सि.स.नं./ फा.प्लॉ.क्र | जमीन/ भोगवटदाराचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ. मी.) | योजनाक्षेत्राची चतु:सिमा | | | |
| | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| फा.प्लॉ.नं. १३२ पैकी, टी.पी. स्कीम नं.३ | पुणे महानगरपालिका | १०१९.७१ चौ.मी. | लागू प्लॉ.नं.१३१ | लागू रस्ता | लागू रस्ता | लागू प्लॉ.नं. १३२ पैकी |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- १३ / १० /२०२३

(नीलेश र. गटणे), (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत-

१. मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव.